**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.६९/२०२४**
**नि.क्र.३६ लगत**

**नि.क्र.१ वरील दिनांक ०७.१२.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे नि.क्र.३६ वर जाबदारतर्फे साक्षीदार क्र.२ मारुती सिध्दू हराळे यांचा उलटतपास अर्जदारमार्फत वकील श्री. ए.एम.पटेल यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचे नाव सिंधू असे नाही, सिध्दू असे आहे. मारुती सिंधू हराळे नावाचा कोणी व्यक्ती आहे किंवा कसे, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आंबेगाव येथे दोडे कुटूंबियांच्या भावकीमध्ये माझी मुलगी दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराकरीता जाबदार क्र.१ चे स्थळ मी आणले होते. माझे शिक्षण बी. कॉम. पर्यंत झाले आहे. अर्जदार व जाबदार क्र.१ यांच्यामध्ये तडजोडीकरीता मी प्रयत्न केले होते. अर्जदार व जाबदार क्र.१ यांच्यामध्ये किरकोळ स्वरुपाचे म्हणजे नक्की कसे वाद होते, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, इस्लामपूर हे मोठे गाव आहे. कर्मवीर भाऊराव पाटील स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी इस्लामपूर येथे नक्की कोठे आहे, हे मला माहिती नाही. मी अर्जदार हिला इस्लामपूर येथे एस. टी. स्टॅण्डवर येताना, जाताना पाहतो. अर्जदार हिला इस्लामपूर एस. टी. स्टॅण्डवर मी सात ते आठ महिन्यांपूर्वी पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर कामामध्ये मी जाबदार क्र.५ म्हणून पक्षकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे काम दाखल झाल्यापासून माझे व अर्जदारच्या कुटूंबियांचे संबंध नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, साखरवाडी गावाला वेगळी ग्रामपंचायत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराने मला या कामात पक्षकार म्हणून सामील केलेने माझा दोडे कुटूंबियांवर राग आहे. हे म्हणणे खरे आहे की, इस्लामपूर येथे माझे कामानिमित्त नेहमी येणेजाणे असते.

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2025.12.20 17:22:55 +0530

अर्जदाराचे एम. एस्सी. चे शिक्षण किती साली व कोणत्या कॉलेजात पूर्ण झाले, याची मला वैयक्तीक माहिती नाही. अर्जदार हिचे एम. एस्सी. चे शिक्षण सन २०२३ मध्ये ती माहेरी असताना पूर्ण झाले, असे माझ्या प्रतिज्ञापत्रात का लिहिले, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आजरोजी जाबदार क्र.१ सोबत न्यायालयात आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार क्र.१ च्या वकीलांच्या सांगण्यानुसार मी आज साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.०४.१०.२०२५ रोजीचे प्रतिज्ञापत्र माझ्या वकीलांनी तयार केले होते व मी त्यावर फक्त सही केली. हे म्हणणे खरे नाही की, जाबदार क्र.१ ला मदत करण्यासाठी मी आजरोजी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही सध्या कोठे आहे व काय करते, याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर खोटा असून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2025.12.20 17:23:02 +0530

**(श्री. ओ. एस. शास्त्री)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**(न्यायालय क्र.५) सांगली.**
दि.२०.१२.२०२५

**समक्ष**

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2025.12.20 17:23:08 +0530

**(श्री. ओ. एस. शास्त्री)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**(न्यायालय क्र.५) सांगली.**
दि.२०.१२.२०२५

स्वाक्षरीत/–

–––––––––––––––––––

साक्षीदार